# BK BIRLA CENTRE FOR EDUCATION

**SARALA BIRLA GROUP OF SCHOOLS**
**SENIOR SECONDARY| CO-ED DAY CUM BOYS' RESIDENTIAL SCHOOL**
**PRE BOARD-1 EXAMINATION 2023-24**
**MARATHI**

B K BIRLA CENTRE FOR EDUCATION (Sarala Birla Group of Schools)

INDIAN PUBLIC SCHOOLS' CONFERENCE

Class : X　　　　Duration : **3** Hrs
Date : 22.11.2024　　　　Max. Marks : **80**

**कृतिपत्रिकेसाठी सूचना :**

**(1)** उपयोजित लेखनातील कृतींसाठी (सूचना निवेदन) आकृतीची आवश्यकता नाही. तसेच या कृती लिहून घेऊ नयेत.

**(2)** स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष दयावे.

---

## विभाग (अ) वाचन व आकलन गुण (15)

**प्र 1 :– (आकलन ) अ: अपठित गद्यांश :–**

बाबा आमटे याचं घराणं मालगुजारांचं. जे मागू ते देणारं. किंबहुना न मागताही देणारं ते घर होतं. आई–वडील,भावंडे,नातेवाईक,मित्र अशांच्या उबेत बाबा सुखात होते. कॉलेजात नाव मिळवत होते. उंची कपडे,उंची वस्तू, उंची मोटारगाडी दिमतीला असे.

डॉक्टर व्हायचे ध्येय मनाशी बाळगले तरी वडिलांचं ऐकण्याचे ते दिवस!त्यामुळे वडिलांच्या मनाप्रमाणे ते वकील झाले. वकिली करू लागले. पण तत्त्वांशी तडजोड किती काळ करता येईल? वकिलीत मन रमेना. वरो–याच्या नगरपालिकेचे उपाध्यक्ष म्हणून निवडून आले. त्या कार्याबरोबर त्यांचं इतरही कार्य चाले. मैल्याच्या पाटया डोक्यावरुन वाहणे,संडास साफ करणे,अशी कामेही ते करत . समाजातील एका विशिष्ट गटानेच ही कामे का करायची?मला सुद्धा ती करण्याचा हक्क आहे म्हणून तेही कामे देखील करत.

एक दिवस रस्त्याच्या कडेला असहय वेदनांनी कण्हत असलेला,नासलेल्या शरीराचा तुळशीराम त्यांना दिसला आणि लक्ष्मीचं नातं सहज तोडलं आणि मुद्दामहून एक नवीन नातेवाईक जोडला दरिद्रीनारायण!

या नातेवाईकांशी सामना करायला एक जिवाभावाचं माणूसही त्यांना गवसलं –इंदू घुले .सात पिढयांचचं महामहोपाध्यांचचं नातं असणारी मुग्ध–अबोल,बुद्धिमान,करारी प्रेंमळ इंदू बाबांची साधना झाली. कष्टाशिवाय जीवन नाही,त्यागाशिवाय सुख नाही.अशी वचनं जिनं आत्मसात केली होती तिच्यासाठी पतिव्रता हा शब्द सर्वार्थाने योग्य वाटावा असा. पतीने घेतलेल्या,स्वीकारलेल्या व्रतासाठी समर्पण करणारी साधना आमटे सर्वाची ताई झाली सौ. साधना आमटे वेळेवर उपचार न झाल्याने महारोग झालेल्या तुळशीरामाचा मृत्यू झालेला पाहून दु:ख झालेल्या बाबांनी ताईजवळ अस्वस्थतेची,दु:खाची कबुली दिली आणि या दु:खाची तीव्रता कमी कशी करता येईल, वेदनेचे आनंदात कसे रुपांतर होईल हा ध्यास या पतीपत्नीला लागला. या ध्यासामुळे आणि अशा समर्थ व्यक्तिमत्त्वांमुळे निर्माण झालं आनंदवन!

**प्र 1 (अ) खालील प्रश्नांची उत्तरे पर्यायामधून निवडा** **(3X1=3)**

1बाबांचे ध्येय काय होते?

अ वकील होण्याचे　　　ब डॉक्टर होण्याचे
क शिक्षक होण्याचे　　　ड वरील सर्व गोष्टींचे

2 बाबांनी मुद्दामहून कोणता नवीन नातेवाईक जोडला?

अ लक्ष्मीनारायण　　　ब इंदू घुले
क साधनाताई आमटे　　　ड दारिद्रीनारायण

3 तुळशीरामचा मुत्यू कशामुळे झाला ?

अ महारोग झाल्यामुळे व उपचार न मिळाल्यामुळे
ब असहय वेदनांमुळे
क महारोग झाल्यामुळे
ड दुःख झाल्यामुळे

**प्र 1 (ब) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :–(कोणतेही तीन)** **(3X1=3)**

1 बाबा कशाचे उपाध्यक्ष झाले ?
2 पूर्वीचे दिवस कसे होते?
3 बाबा आमटे यांनी कोणाशी नाते जोडले?
4 बाबा आमटे यांनी कोणती वचने आत्मसात केली?

**प्र 1(क) उता–याच्या आधारे खालील प्रश्नाचे उत्तर थोडक्यात लिहा :–(कोणताही एक)** **(1X2=2)**

1 तुळशीराम विषयी तुम्हांला समजलेली माहिती लिहा –
2 कुणाच्या सहकार्यामुळे आनंदवनाची निर्मिती झाली ?

**प्र 2:– (आकलन ) अः– अपठित पद्यांश**

राजास जी महाली, सौख्य कधी मिळाली
ती सर्व प्राप्त झाली, या झोपडीत माझ्या
भूमीवर पडावे,ता–यांकडे पहावे
प्रभुनाम नित्य गावे, या झोपडीत माझ्या
पहारे आणि तिजो–या यातून होती चो–या
दारास नाही दो–या या झोपडीत माझ्या
जाता तया महाला मज्जाव शब्द आला
भीतीने यावयाला, या झोपडीत माझ्या
महाली मऊ बिछाने, कंदील शामदाने
आम्हा जमीन माने या झोपडीत माझ्या
पाहून सौख्य माझे, देवेंद्र तो ही लाजे
शांती सदा विराजे या झोपडीत माझ्या

**प्र 2 (अ) खालील प्रश्नांची उत्तरे पर्यायामधून निवडा :–** **(3X1=3)**

1 सर्व सुखे कोठे प्राप्त झाली ?
**अ** घरात **ब** महालात **क** झोपडीत **ड** गावात
2 बिछाने , कंदील शामयाने कोठे आहेत ?
**अ** विदयालयात **ब** वस्तीगृहात **ग** महालात **घ** झोपडीत
3 चो–या कोठून होतात ?
**अ** बॅकांमध्ये **ब** तिजो–यातून **ग** घरातून **ड** बंगल्यातून

**प्र 2 (ब) एका वाक्यात उत्तरे लिहा :–** **(4X1=4)**

1 झोपडीत कोणते सुखे आहेत असे कवीला वाटते ?
2 चो–या कशा होतात ?
3 महालात काय काम आहे ?
4 कवीच्या झोपडीत काय आहे?

**विभाग :– ब ( 20 गुण)**

**प्र 3 (अ) शब्दांच्या जाती ओळखा :– (कोणतेही चार)** **(4X1=4)**

1 राधा व मीरा महान भक्त होत्या.
अ सर्वनाम ब विशेषण क नाम ड अलंकार
2 अरेरे! किती भयानक हा अपघात! ( केवलप्रयोगी अव्यय ओळखा)
अ किती ब अरेरे क भयानक ड हा

3 शाळेमध्ये अभ्यासू विदयार्थी आहेत. (अधोरेखित शब्दाची जात ओळखा)

अ क्रियाविशेषण अव्यय | ब विशेषण

क शब्दयोगी अव्यय | ड सर्वनाम

4 मुलांनी काल मैदानावर खूप खेळ खेळला. ( क्रियाविशेषण अव्यय ओळखा)

अ काल | ब खूप | क मैदान | ड मुले

5 आई आली व तिने स्वयंपाक केला. ( आधोरेखित शब्दाची जात ओळखा)

अ विशेषण | ब उभयान्वी अव्यय

क क्रियाविशेषण अव्यय | ड अलंकार

**प्र 3 (ब) काळ ओळखा व बदला ( कोणतेही तीन) (3X1=3)**

1 नीना आज घरी आली आहे. ( काळ ओळखा).

2 योगिता दिलेला अभ्यास पूर्ण करेन. ( काळ ओळखा)

3 मिथिला नगरीचे रामराजे काल सकाळपासून चिंतेत होते . ( वर्तमानकाळ करा )

4 काठी रात्री दोन इचांनी वाढणार . (काळ ओळखा)

**प्र 3 (क) वाक्याचे प्रकार ओळखा ( कोणतेही तीन) (3X1=3)**

1 किती छान आहे ताजमहल !

2 रेखा मावशींचे पाय स्वच्छ आहेत. ( नकारार्थी करा )

3 तुम्ही आतापर्यंत किती झाडे लावली ?

4 राष्ट्रगीताचा मान राखा.

**प्र 3 (ड) समानार्थी शब्द ( कोणतेही दोन) (2X1=2)**

1 शालीन 2 आनंद 3 धेनु

**प्र 4 (अ) विरुध्दार्थी शब्द ( कोणतेही दोन) (2X1=2)**

1 खाजगी 2 खर्च 3 उपयोग

**प्र 4 (ब) लिंग बदला ( कोणतेही दोन) (2X1=2)**

1 विदयार्थी 2 उंदीर 3 थोरला

**प्र 4 (क) वचन बदला ( कोणतेही दोन) (2X1=2)**

1 रंग 2 कल्पना 3 रसिक

**प्र 4 (ड) समास ओळखा ( कोणतेही दोन) (2X1=2)**

1 भाजीपाला 2 नवरात्री 3 यथाशक्ती

## विभाग–क पाठयपुस्तक आधारित (30 गुण)

**प्र 5 (अ) एका वाक्यात उत्तरे लिहा (कोणतेही तीन) (3X1=3)**

1 निरंजनचा शेवटचा पेपर कोणता होता?

2 लेखकाच्या आईला कमी शिक्षणामुळे कोठे काम मिळाले नाही?

3 मराठी भाषादिन केव्हा साजरा होतो ?

4 मुलांची सहल कोणत्या गावी नेण्याचे ठरले?

**प्र 5 (ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा (कोणतेही तीन) (3X1=3)**

1 रेखामावशीचे पाय ––––––आहेत.

2 वजनाचा मार्ग भलत्याच ––– जातो.

3 आयुष्याचे फार मोठे ––– मला भावेसरांच्या या शिकवणुकीतून गवसले.

4 एखादया –––एकाएकी रंग उडून जावा तशी जीवनेच्छा एकाएकी उडून गेली.

**प्र 5 कः– खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर थोडक्यात लिहाः– (1X3=3)**

1 तुम्हांला आवडलेल्या कोणत्याही एका साहित्यप्रकाराची वैशिष्टे तुमच्या शब्दात लिहा –

2 तापाने फणफणतीय आपली धरती ही परिस्थिती बदलण्यासाठी उपाय सुचवाः–

3 निरंजनच्या जडणघडणीत भडसावळे गुरुजींचा मोलाचा वाटा आहे,स्पष्ट कराः–

**प्र 5 डः– वाक्प्रचारांचा योग्य वापर करून वाक्य पुन्हा लिहा :–** **(5X1=5)**

(अंगाचा तीळपावड होणे/आर्जव करणे/पारंगत असणे/भान ठेवणे/तथ्य असणे)

1 थोर व्यक्तींचा योग्य तो मान ठेवावा याची सर्वांना जाणीव असली पाहिजे.
2 लहानगा गोपाळ संगणक वापरण्यात खूप तरबेज आहे.
3 पगार वाढवावा म्हणून गणूने मालकाकडे विनंती केली.
4 घरातील पसारा पाहून आईला खूप राग आला,
5 रामूच्या बोलण्यात खरेपणा आहे याची वामनरावांना सत्यता वाटली.

**प्र 6 अ :– (अ) एका वाक्यात उत्तरे लिहाः– ( कोणतेही चार )** **(4X1=4)**

1 कशापुढे लोकांची शान तोडकी पडते ?
2 कशाचा ललकार घुमावा असे कवी किशोर पाठक यांना वाटते?
3 तोफा धडाडताना सैनिकाचे पाऊल कसे पडते ?
4 कवीचे हात कोणाकडे गहाण पडले?
5 हरिणी कोणासाठी चिंतीत आहे ?

**प्र 6 (ब) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा :–(कोणतेही चार)** **(4X1=4)**

1 –––– मी दास तुझा .
2 हरघडी ––– वाळविले नाहीत.
3 –––– करतो आहे किती डोईवर राहिले उन्हाळे.
4 नाही ––––––– द्रव्य.
5 घराघरांतून जन्म घेतेसे तेज नवा –––––––.

**प्र 6 क) खालील काव्यपंक्तींचे संदर्भासहित स्पष्टीकरण कराः–(कोणतेही एक)** **(1X3=3)**

1 झोतभट्टीत शेकावे पोलाद तसे आयुष्य छान शेकले
दोन दिवस वाट पाहण्यात गेले दोन दुःखात गेले

**किंवा**

वर घोंघावे बंबारा
पुढे कल्लोळ धुरांचे
धडाडत्या तोफांतून
तुझे पाऊल जिद्दीचे

**प्र 7 अ स्थूलवाचन :– एका वाक्यात उत्तरे लिहा :– ( कोणतेही तीन )** **(3X1=3)**

1 अखिल भारतीय मराठी संमेलन केव्हा व कुठे भरले होते ?
2 दिवाळी हा शब्द मूळ कोणत्या भाषेतून आला आहे ?
3 व्युत्पत्ती कोशाचे अध्यक्ष कोण होते?

**प्र 7 (ब) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर 40ते 50 शब्दात लिहा :–** **(1X2=2)**

1 स्काय इज लिमिट ही परिस्थिती केव्हा निर्माण होऊ शकते ?
2 व्युत्पत्ती कोशाची कार्य थोडक्यात लिहा–

**विभाग– ड लेखन– (गुण 15)**

**लेखन**

**प्र 8 अ खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा :–** **(1X6=6)**

**1** आमच्या शाळेतील क्रीडादिन

मुद्देः– मुलांसाठी उत्साहाचा दिन––विविध खेळांचे आयोजन –– विदयार्थ्यांमध्ये जिंकण्यासाठी चुरस–पालकांना झालेला आनंद––विजेत्यांचे सर्वाकडून झालेले कौतुक .

**2 मी मुख्यमंत्री झालो तर ......**

मुद्दे :– देशाचे भविष्य ––– सध्याची स्थिती ––– तणाव व समस्या ––– उपाययोजना ....अपेक्षा

**3 क्रीडांगणाचे मनोगत**

मुद्दे :– पूर्वी असलेले महत्त्व ––– विविध मैदानी खेळ –––विदयार्थ्यांची किलबिल–––आजची स्थिती...खंत ....परिणाम.

**प्र 8 (ब) मुद्दयावर आधारित गोष्ट लिहा. (शीर्षक आणि तात्पर्य आवश्यक) (1X5=5)**

उंट व कोल्हा मित्र–––पाणी पिण्यासाठी नदीवर जाणे––नदी पलीकडे उसाचे शेत पाहून खाण्याची इच्छा––उंटाचे कोल्हाला पाठीवर बसवून नदी पार करणे––लवकर पोट भरल्याने कोल्हाचे ओरडणे––उंटाची न ओरडण्याची विनंती––मालक धावत येणे–कोल्हाचे पळून जाणे–– उंटाला मार––परत येताना उंटाचे पाण्यात बसणे––कोल्हाची न बसण्याची विनंती –––तात्पर्य .

किंवा

एक शिकारी ––शेतात जाळे––कबुतरांचा थवा ––शेतातील दाणे टिपणे –––जाळयात अडकणे––प्रमुखाचा सल्ला –––जाळे घेऊन उडा –––कबुतरांचे जाळयासहित उड्डाण –––सुटका –––तात्पर्य.

**प्र 8 (क) पत्र लेखन :– ( कोणतेही एक ) (1X4=4)**

तुम्ही राधा/रमन कुलकर्णी, गांधी मार्ग,सोमवार पेठ,पुणे–404430,रहिवाशी आहे.तुमच्या भागातील वीज वारंवार खंडित होत असल्यामुळे वीज वितरण मंडळास तक्रार पत्र लिहा.

**किंवा**

वनिता/विनय पाटील, विदयानिकेतन विदयालय,सोलापूर येथून शाळेच्या प्रयोगशाळेसाठी साहित्य मागविणारे पत्र दुर्गा साहित्य भंडारास लिहा :–

**:::::::::::::::::::::: समाप्त ::::::::::::::::::::::::::**